<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६७९/२०२२ मधील नि.१ वरील आदेश</u>

**भगवान जाधव विरुध्द निरंक**

**<u>[CNR NO. MHBIO 800-1581-2022]</u>**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे.

अर्जदारांच्या अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे.

२. अर्जदार क्र.१ चा भाउ व अर्जदार क्र.२ चा दिर नामे धुराजी पि. भिमराव जाधव यांचा मृत्यू **दि. २८.१०.२०१९** रोजी मौ. तालखेड, ता. माजलगाव जि. बीड येथे झालेला आहे. अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही वारस नाही. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, त्यामुळे अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदारांतर्फे युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पहाणी केली.

४. अर्जातील बाबींना व अर्जदारांच्या युक्तीवादास अनुसरुन खालील मुद्दे माझे समोर उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| | मुद्दे | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | केवळ अर्जदार क्र.१. |
| २. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

**<u>कारणमिमांसा</u>**

<u>मुद्दा क्र १ बाबत</u>

५. अर्जदारांनी त्यांच्या अर्जातील कथनाच्या पुष्ठयार्थ अर्जदार क्र.१ भगवान भिमराव जाधव यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.११), मयताचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र ०६ वर दाखल केले आहे. तसेच वर्तमानपत्रामधील जाहीर प्रगटन केल्याची प्रत नि.क्र.१०, अर्जदार क्र.२ ही मयताची भावजई असल्याने ती कायद्याप्रमाणे वारस होत नसल्याने केवळ अर्जदार क्र.१च्या नावाने वारस प्रमाणपत्र देण्याबाबत पुरशीस (नि.क्र.१२) अशी कागदपत्रे दाखल केली आहेत.

६.       प्रस्तुत प्रकरणात आक्षेप मागविण्यासाठी **दि. २४.१०.२०२२** रोजी दै.माजलगाव टाईम्स (नि.क्र.१०) या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन दिले होते. परंतु आजपर्यत कोणीही आक्षेप नोंदविला नाही.

७.       अर्जदाराच्या कथनानुसार मयताची पत्नी नामे जनाबाई धुराजी जाधव ही दि. ३१.०७.२०१९ रोजी मयत झालेली आहे. सदर कथनाचे पृष्ठयर्थ अर्जदाराने नि.क्र.७ वर तिचे मृत्यु प्रमाणपत्र सादर केलेले आहे. अर्जदारांच्या कथनानुसार मयत धुराजी व जनाबाई हे नि:संतान होते. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार क्र.२ ही मयताची भावजई आहे. तसेच अर्जदार क्र.१ हा मयताचा सख्खा भाउ आहे. हिंदु वारस कायद्यातील परिशिष्टानुसार मयताचा भाउ हा वर्ग —२ मधील संवर्गात येतो, त्यामुळे मयताचा वारस म्हणून केवळ अर्जदार क्र.१ हाच पात्र ठरतो. अर्जदाराने नि.क्र. १२ वर पुरशीस देवून केवळ अर्जदार क्र.१ भगवान भिमराव जाधव याच्या नावाने वारस प्रमाणपत्र देण्यास कळवले आहे. त्यामुळे केवळ अर्जदार क्र.१ हाच मयताचा कायदेशीर वारस असून त्याच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणतीही अडचण नाही.

८.       अर्जदार क्र.१ भगवान पि. भिमराव जाधव हा मयताचे वारस असल्याबाबत त्याने आवश्यक तो पुरावा सादर केलेला आहे. अर्जदाराने त्याच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये, मयतास, केवळ अर्जादारांव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्याचे शपथेवर कथन केले आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ हा मयताचे वारस आहे हे सिध्द होते. त्यामुळे मी मुद्दा क्र १ चा निष्कर्ष वरीलप्रमाणे नोंदवुण, मुद्दा क्र २ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१भगवान पि. भिमराव जाधव हा मयत धुराजी पि. भीमराव जाधव यांचा कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस—प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

३) आवश्यक ते न्यायालयीन शुल्क स्विकारुन अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

MAHESH ARVINDRAO KULKARNI
Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2023.03.15 12:03:40 +05'30'

दिनांक : ०१.०३.२०२३.

ठिकाण : माजलगाव.

**( एम.ए.कुलकर्णी )**
४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
माजलगाव.